**<u>ठळक बातम्या</u>**

मुंबईत मराठा आरक्षण आंदोलनाचा जनजीवनावर परिणाम, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरात वाहतूक ठप्प

आंदोलनासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात तातडीची सुनावणी सुरु

व्यावसायिक वापराचे गॅस सिलेंडर साडे एक्कावन्न रुपयांनी स्वस्त

शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर बैठकीनंतर प्रसिद्ध झालेल्या तिएनजीन जाहीरनाम्यात पहलगाम हल्ल्याचा तीव्र निषेध

**आणि**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करुन प्रधानमंत्री मोदी मायदेशी परतण्यासाठी रवाना

**<><><><>**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मुंबईच्या आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनाचा आज चौथा दिवस आहे. आंदोलनातले कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमा झाल्यामुळे देशाची आर्थिक राजधानी - मुंबईच्या जनजीवनावर परिणाम झाला आहे. याबद्दलची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

**- *- होल्ड… व्हीसी- -***

*(मुंबईच्या सीएसएमटी परिसरात आंदोलकांची गर्दी वाढल्यानं या परिसरातल्या सर्व रस्त्यांवरची वाहतूक ठप्प झाली आहे. जे. जे. उड्डाणपूल आणि हुतात्मा चौक मार्गे सीएसएमटीला येणारे रस्ते वाहतुकीसाठी बंद केले आहेत. मंत्रालयासमोरचा मार्ग आणि मादाम कामा रस्ता ते मरीन ड्राइव्ह जंक्शन वाहतुकीसाठी बंद आहे. या मार्गावरची वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे. पूर्व मुक्त मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. सीएसएमटी परिसरातली बेस्ट वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयाकडे जाणाऱ्या नवी मुंबई महापालिका परिवहन सेवेच्या सर्व बस आंदोलन संपेपर्यंत बंद राहणार आहेत. भगवा फेटा घातलेल्या आंदोलकांचे थवे दक्षिण मुंबईतल्या फोर्ट आणि मरीन ड्राईव्ह परिसरात घोषणा देत फिरताना दिसत आहेत.*

*काही आंदोलकांनी मध्यरेल्वेच्या छत्रपती शिवाजी टर्मिनसमधे रुळांवर उतरुन तसंच विजेच्या खांबांवर चढून घोषणा दिल्या.  ….मुंबईहून अंकिता आपटे)*

दरम्यान, सर्वसामान्य नागरिकांना त्रास होईल असं कुठलंही वर्तन करू नका, असं आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलकांना केलं आहे.

या परिस्थितीवर मार्ग काढण्यासाठी काल मराठा आरक्षणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीच्या दोन बैठका झाल्या. मात्र त्यातून तोडगा निघाला नाही. आज वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत बैठक झाली.

**<><><><>**

सर्वसामान्यांना त्रास होईल असं वर्तन करुन मराठा आंदोलनाला गालबोट लागू देऊ नका, असं आवाहन अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी आज मुंबईत मराठा आंदोलकांना केलं. महायुती सरकार मराठा समाजाच्या मागण्यांवर तोडगा काढेल, तोपर्यंत शांततेत आंदोलन करा, असं ते वार्ताहर परिषदेत म्हणाले.

महायुती सरकारनं मराठा समाजासाठी राबवलेल्या विविध योजनांची माहिती त्यांनी दिली. यंदाच्या अर्थसंकल्पात महामंडळासाठी साडेसातशे कोटींच्या निधीची तरतूद आहे. गेल्यावर्षी या सरकारनं महामंडळाला साडेतीनशे कोटी रुपये दिले होते, असंही ते म्हणाले. मराठा आंदोलनाची दिशा भरकटली असून सध्याचे आंदोलन हे केवळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधातलं आंदोलन झालं असल्याची टीका त्यांनी केली. महाराष्ट्रात मराठा समाजाचे १२ मुख्यमंत्री झाले पण त्यांनी समाजाला काहीच दिलं नाही. मराठवाड्यातले सर्वात जास्त मुख्यमंत्री होते तरीही गरीबी का दूर झाली नाही याविषयावर कॉँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांनी आत्मचिंतन करावं, असं ते म्हणाले.

**<><><><>**

आझाद मैदानाबाहेर मराठा आंदोलक उपस्थित असल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयानं नाराजी व्यक्त केली. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर मुंबई उच्च न्यायालयात आज विशेष सुनावणी होत आहे. अमी फाऊंडेशनं दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती गौतम अंखड आणि रविंद्र घुगे यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी सुरू आहे. सीएसएमटी, मंत्रालय, मरीन ड्राइव्ह, उच्च न्यायालय आणि इतर परिसरात आंदोलक का जमले आहेत,

असा सवाल न्यायालयानं केला. जरांगे-पाटील यांच्या तब्येतीविषयी त्यांनी काळजी व्यक्त केली आणि त्यांनी वैद्यकीय मदत घ्यावी असं खंडपीठ म्हणाले. आझाद मैदानातल्या आंदोलनाच्या संदर्भात न्यायालयाच्या यापूर्वीच्या आदेशाचं उल्लंघन का झालं, असा सवाल न्यायालयानं महाधिवक्त्यांना केला.

<><><>

मुंबईत पाच दिवसांच्या गणरायांचं विसर्जन काल झालं. ३६ हजारापेक्षा जास्त गणपतींना आज पहाटेपर्यंत निरोप देण्यात आला. यात ८०० पेक्षा जास्त सार्वजनिक आणि ३५ हजारापेक्षा जास्त घरगुती गणेशमूर्तींचा समावेश होता. विसर्जन व्यवस्थित पार पडावं, यासाठी महानगरपालिका आणि मुंबई पोलिसांनी चोख व्यवस्था केली होती. ठाण्यातही पाच दिवसांच्या गणपतींचं विसर्जन झालं.

<><><>

गणेशोत्सवादरम्यान आज राज्यात अनेक ठिकाणी गौरीपूजन होत आहे. घरोघरी सुरेख आणि सुबक गौरी प्रतिमा किंवा महालक्ष्मीच्या मुखवट्यांची प्रतिष्ठापना करुन त्यांना आकर्षक आरास केली जाते. पंचपक्वानांचा आणि स्थानिक मोसमी भाज्या आणि कृषी उत्पादनं वापरुन साग्रसंगीत नैवेद्य अर्पण केला जातो. उद्या गौरी विसर्जनाने या तीन दिवसांच्या सोहळ्याची सांगता होईल. गौरींबरोबरच्या गणपतींचं विसर्जनही उद्या होईल.

<><><>

तेल वितरण कंपन्यांनी व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडरचे दर ५१ रुपये ५० पैशांनी कमी केले आहेत. त्यानुसार १९ किलो वजनाचे व्यावसायिक गॅस सिलेंडर आता नवी दिल्लीत १ हजार ५८० रुपयांना तर मुंबईत पंधराशे एकतीस रुपये पन्नास पैशांना उपलब्ध असतील. घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरच्या दरांमध्ये मात्र कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

<><><>

आकाशवाणीची एफ एम गोल्ड वाहिनी आज २४वा वर्धापन दिन साजरा करत आहे. ताज्या बातम्या श्रोत्यांना देण्यासाठी माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं २००१ मधे ही वाहिनी खास सुरु केली होती. सुर्खीयों मे तसंच स्पॉटलाईट अँड मनी मॅटर्स हे या वाहिनीचे

कार्यक्रम लोकप्रिय ठरले आहेत. कोविड १९ च्या साथीदरम्यान आरोग्यविषयक विविध कार्यक्रम प्रसारित करून या वाहिनीनं मोठ्या प्रमाणात जनजागृती केली होती.

<><><><>

चीनमधे तिएनजीन इथं सुरू असलेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर बैठकीनंतर तिएनजीन जाहीरनामा प्रसिद्ध झाला. त्यात भारताच्या प्रादेशिक सहकार्य आणि नवोन्मेष क्षेत्रातल्या योगदानाची दखल घेण्यात आली आहे. तसंच यात दहशतवादाविरोधात स्पष्ट संदेश देण्यात आला आहे. शांघाय सहकार्य संघटनेच्या सदस्य देशांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला असून या हल्ल्यात मरण पावलेल्यांच्या प्रियजनांप्रति सहवेदना व्यक्त केल्या आहेत. हल्ला घडवून आणणाऱ्यांना जबाबदार धरायला हवं अशी स्पष्ट भूमिका घेऊन सर्व सदस्य देशांनी दहशतवादाविरोधात लढाईप्रति वचनबद्ध असल्याचं सांगितलं. मे २०२५ मधे शांघाय सहकार्य संघटनेच्या थिंक टँक फोरम भारतात यशस्वी आयोजन केल्याबद्दल सदस्य देशांनी भारताचं अभिनंदन केलं.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यात आज चीनमधे तियेनजिन इथं द्विपक्षीय चर्चा झाली. ऊर्जा, आर्थिक क्षेत्रात द्विपक्षीय संबंधामुळे सातत्याने होणाऱ्या प्रगतीबद्दल दोन्ही नेत्यांनी समाधान व्यक्त केलं. युक्रेनमधील संघर्षासह अनेक प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरही चर्चा झाली. युक्रेनमधला संघर्ष थांबवण्यासाठी रशियाने अलिकडे उचललेल्या पावलांवर मोदी यांनी समाधान व्यक्त केलं तसंच यावर लवकरात लवकर तोडगा काढावा अशी अपेक्षा व्यक्त केली. दोन्ही देशातील धोरणात्मक संबंध अधिक बळकट करण्यावर यावेळी सहमती झाली.

त्याआधी प्रधानमंत्री मोदी आणि पुतीन यांनी बैठकीच्या ठिकाणापर्यंत एकत्र प्रवास केला. पुतीन यांच्यासोबतची चर्चा नेहमीच अर्थपूर्ण असते असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे.

त्यानंतर चीन दौरा आटोपून प्रधानमंत्री मोदी नवी दिल्लीसाठी रवाना झाले आहेत.

<><><><>

आग्नेय अफगाणिस्तानात काल  रात्री झालेल्या भूकंपातल्या बळींची संख्या ६०० वर गेली आहे. जलालाबादच्या पूर्व-ईशान्येला २७ किलोमीटर अंतरावर भारतीय वेळेनुसार रात्री १२ वाजून ४७ मिनिटांनी झालेल्या या भूकंपाची तीव्रता रिक्टर मापकावर ६ होती.

<><><><>

देशाच्या उत्तर भागात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस होत असून अनेक राज्यांमधे पूरस्थिती निर्माण झाली आहे. जम्मू काश्मीरमधे पुरामुळे झालेल्या नुकसानीची हवाई पाहणी आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज केली. हिमाचल प्रदेश उत्तराखंड पंजाब आणि हरियाणात नद्यांचे प्रवाह फुगले आहेत. ठिकठिकाणी मदत आणि बचावकार्य सुरु आहे.

जम्मूतली वैष्णोदेवी यात्रा अद्याप स्थगित असून उत्तराखंडमधली केदारनाथ यात्रा ३ सप्टेंबरपर्यंत स्थगित केली आहे.

<><><><>

यंदाच्या खरिप हंगामात मे ते ऑगस्ट या चारही महिन्यात नांदेड जिल्ह्याला प्रतिकूल निसर्गाचा मोठा फटका बसला असून जिल्ह्यातील ९३ पैकी ८८ मंडळात अतिवृष्टी झाल्यामुळे पिकांचं नुकसान झालं आहे. रस्ते, पूल, घरं, पशुधनासह शेतीचं मोठ्या प्रमाणात झालेलं नुकसान पाहता जिल्ह्याला भरीव आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी खासदार अशोक चव्हाण यांनी केली आहे.

अकोला जिल्ह्यात गेल्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीत पिकांचे प्रचंड नुकसान झालं आहे.सोयाबीन, कापूस, तूर या खरीप पिकांसह इतर पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं तसंच नदीकाठच्या  परिसरात जमीन खरडून गेली.   जिल्ह्यात अनेक घरांची पडझड झाली असून नदी आणि नाल्याना पूर आल्याने जनजीवन विस्कळीत झालं आहे.  त्यामध्ये अकोला आणि मुर्तीजापुर दोन तालुक्यातील चार महसूल मंडळाच्या परिसरात अतिवृष्टीची नोंद करण्यात आली आहे.

लातूर जिल्ह्याच्या रेणापूर प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रातील पाण्याची आवक लक्षात घेऊन आज सकाळी प्रकल्पाचे दोन दरवाजे उघडण्यात आले असून ६२९ पूर्णांक २२ दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद या वेगाने विसर्ग करण्यात येत आहे. धरणामध्ये येणारी पाण्याची आवक पाहून विसर्ग वाढवणं किंवा कमी करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे नदी

काठावरील गावातल्या नागरीकांनी खबरदारी घ्यावी असं आवाहन प्रकल्प प्रशासनाने केलं आहे.

**<><><><>**

येत्या २४ तासात मराठवाडा आणि विदर्भात जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे,  सातारा,आणि कोल्हापूर जिल्ह्यातला घाटमाथा परिसर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, आणि चंद्रपूर जिल्ह्यात हवामानविभागाने यलो अलर्ट दिला आहे.

**//<><><><>//**